# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १२/१०/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## पो.स्टे. कन्हान हद्दीत अल्युमिनियम तार चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई...

दि. ११/१०/२०२२ रोजी कन्हान उपविभातील पो.स्टे. कन्हान हद्दीत आरोपी शोध व जुगार रेड कामी फिरत असतांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पोलिस ठाणे कन्हान परिसरातुन चोरीचे गुन्हयात दोन संशयित इसमांना ताब्यात घेवुन सखोल विचारपूस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील मौजा बोरी सिंगोरी, केरडी शिवारात MSEB चे पोल वरील अल्युमिनियम चे तार खोलून चोरी केल्याचे कबूल करून चोरीचा संपूर्ण माल कन्हान येथील कबाडी व्यवसायिक याला विकल्याचे कबुल केल्याने कबाडी व्यवसायिक याचे ताब्यातून तिन्ही गुन्हातून चोरीस गेलेला संपूर्ण अल्युमिनियम तार एकुण ७७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून चोरीचे ३ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

आरोपी १) हरीश रामसिंग गौतम, वय १९ वर्ष, २) प्रफुल सिद्धू धूरवे, वय २२ वर्ष, दोन्ही रा. खदान नं. ४ कन्हान त. परशिवणी, ३) कबाडी व्यवसायिक— देवकुमार सुरजप्रसाद देहरिया, वय ५८ वर्ष, रा. संताजी नगर कन्हान यांना अटक करण्यात आली असून उघडकीस आलेले गुन्हे.....

१) पो. स्टे. कन्हान अप. क्र. १६६/२२ कलम ३७९,४२७ भा.द.वि. सहकलम १३६ म वि का

२) पो. स्टे. कन्हान २१०/२२ कलम ३७९,४२७ भा.द.वि. सहकलम १३६ म वि का

३) पो. स्टे. कन्हान ३९४/२२ कलम ३७९ भा.द.वि.

नमुद ३ आरोपीं जप्त मुद्देमाल व कागदपतत्रांसह पुढ़िल तपास कामी पोलीस स्टेशन कन्हान यांचे ताब्यात दिले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. वियजकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर ना. ग्रा. यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात पोहवा अरविंद भगत पोना शैलेश यादव, वीरेंद्र नरड यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर